# Newspaper : Maharashtra Times

# Date : 04.08.2020

# उत्साहानं, पण नियमात

**गणेशोत्सवाचे वेध लागले असून, ज्या कॉलेजांमध्ये बाप्पांचं आगमन होतं, त्यासाठी उत्साहानं तयारी सुरू झाली आहे. यंदा करोना संकटाच्या पार्श्वभूमीवर यंदाचा कॅम्पसमधला गणेशोत्सव कसा असणार आहे, त्याचा घेतलेला एक आढावा.**

**अभिषेक तेली**, रुईया कॉलेज
muntainbox@gmail.com

गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतले काही कॉलेजांचे कॅम्पसही भक्तीभावात रंगून जातात. यंदा मात्र गणेशोत्सव साजरा होणार असला, तरी करोना संकटामुळे त्यावर मर्यादा असून, अनेक बदल करण्यात येणार आहेत.

### पर्यावरण रक्षणाचा संदेश

चेंबूरच्या **श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्स**मध्ये एनएसएस युनिटच्या माध्यमातून गेल्या वर्षीपासून गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली होती. यंदा 'कोव्हिड १९' साथीच्या विषाणूच्या पार्श्वभूमीवर, सरकारनं आखून दिलेले सर्व नियम पाळूनच दुसऱ्या वर्षाचा गणेशोत्सव साजरा होणार आहे. गणपतीची मूर्ती ही खास पेणमध्ये तयार करण्यात आली असून, ती मातीची आहे. या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा एनएसएस युनिटनं दत्तक घेतलेल्या देवनार भागात होणार आहे. दहा दिवसांसाठी गणपतीचं आगमन होणार असून, इकोफ्रेंडली गणेशोत्सव आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारी विसर्जन मिरवणूक असेल. त्यानंतर कॉलेजमध्येच बाप्पाच्या मूर्तीचं विसर्जन टबमध्ये होऊन, ती माती रोपं लावण्यासाठी वापरण्यात येणार आहे. परिसरातील गणेशोत्सव मंडळांतील निर्माल्य गोळा करून त्याचं खतामध्ये रुपांतर करण्यात येईल.

### तंत्रज्ञानाची जोड

माटुंग्याच्या **वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था**, म्हणजेच 'व्हीजेटीआय'चे विद्यार्थी यंदाही गणेशोत्सव साजरा करणार आहेत. पण, यंदा करोनाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणानं आणि सरकारचे सर्व नियम पाळत गणेशोत्सव साजरा होईल. पर्यावरणपूरक मूर्तीची स्थापना करून, आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर करून ऑनलाईन पद्धतीनं विविध समाजोपयोगी विधायक कार्यक्रम करण्याचा विद्यार्थ्यांचा मानस आहे. करोना विषयीची जनजागृती करण्यासाठी प्रश्नमंजुषा, लॉकडाउनमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला ताणतणाव कमी करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींशी ऑनलाईन चर्चा - संवाद अशा कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येईल. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मदत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना डॉ. धिरेन पटेल, डॉ. केशव सांगळे, डॉ. विकास वरेकर मार्गदर्शन करीत आहेत.




### रुईयाच्या विद्यार्थ्यांचा राजा

यंदाही '**रुईया** नाका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ' गणेशोत्सव साजरा करणार आहे. कोव्हिड संकटामुळे गणेशोत्सव साजरा करण्यावर मर्यादा आहेत. दहा दिवस गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना होणार असून, गणेशमूर्ती शाडू मातीची चार फुटांची असेल. दरवर्षी आकर्षण असलेली बाईक रॅली होणार नाही. आगमन व विसर्जन मिरवणूक होणार नाही. सरकारनं आखून दिलेल्या नियमांचं पालन करतच यंदाचा गणेशोत्सव साजरा होईल. यंदा करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर जनजागृतीसाठी कोणती संकल्पना घेऊन उपक्रम राबवायचे यावर समितीमध्ये चर्चा सुरू आहे.

### परंपरा अखंडित

माटुंग्याच्या **पोदार कॉलेज**च्या दीड दिवसांच्या गणेशोत्सवाचं यंदा ८० वं वर्ष आहे. यंदाच्या संकटकाळात सर्वांची सुरक्षितता पाहता, सरकारचे सर्व नियम पाळत बाप्पाची प्रतिष्ठापना कॉलेजच्या हॉलमध्ये किंवा एका विद्यार्थ्याच्या घरी करण्यात येईल. परिस्थिती पूर्ववत झाल्यावर साधारणपणे माघी गणेशोत्सवाच्या वेळी कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक भान राखत एक संकल्पना घेऊन, सर्व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित पोदारच्या राजाची ८० वर्षांची परंपरा अखंडित ठेवण्यात येणार आहे. या गणेशोत्सव मंडळानं, 'प्रवास - स्वदेशी ते आत्मनिर्भर' आणि करोना काळातील गणेशोत्सव या विषयांवर ऑनलाइन पोस्टर मेकिंग स्पर्धेचं आयोजन केलं आहे.

### विद्यार्थ्यांचं आरोग्य जपणार

'विद्यार्थ्यांचा विघ्नहर्ता' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणरायाची प्रतिष्ठापना माटुंग्याच्या **डी. जी रुपारेल कॉलेज**मध्ये होते. कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मिळून हा गणेशोत्सव कॉलेजच्या कँटिनमध्ये साजरा करतात. कँटिनचे कर्मचारीही यात सहभागी होत असतात. यंदा करोनामुळे फक्त कॉलेज आणि कँटिन कर्मचारी अशा मोजक्या लोकांच्या उपस्थितीतच गणेशोत्सव साजरा होईल. विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही. त्याचबरोबर यंदा पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येत असून, विसर्जनसुद्धा कॉलेजच्या आवारात एका टबमध्ये करण्यात येईल. ते पाणी कॅम्पसमधील झाडांना घालण्यात येईल. आगमन व विसर्जन मिरवणूकसुद्धा यंदा होणार नाही. साधेपणानं, सर्व नियम पाळत गणेशोत्सव साजरा होईल.